# महाराष्ट्र शासन
# अन्न व औषध प्रशासन

प्रेस नोट

**कोल्ड्रिफ सिरप, समूह क्र एस आर १३ (Coldrif Syrup,** Batch No. SR-13)

**या कफ सिरपमध्ये विषारी पदार्थ आढळल्यामुळे त्याचा वापर थांबविण्याबाबत सूचना**

दिनांक: ०५-१०-२०२५

मध्यप्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये कफ सिरप औषधाच्या वापरामुळे काही बालकांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे. या बाबत महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाला सतर्क करण्यात आले आहे. **कोल्ड्रिफ सिरप, समूह क्र:एस आर १३ (Coldrif Syrup,** Batch No. SR-13) निर्मिती दिनांक : मे-२०२५, कालबाह्यता दिनांक: एप्रिल-२०२७ , हे औषध मे. स्रेसन फार्मा, कांचीपुरम जिल्हा, तामिळनाडू (**Sresan Pharma, Sunguvarchathiram, Kancheepuram District, Tamil Nadu**) यांच्या द्वारे उत्पादित केलेले असून त्यामध्ये डायइथिलीन ग्लायकोल (Diethylene Glycol - DEG) हा विषारी घटक मिसळलेला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या पार्श्वभूमीवर, राज्यातील सर्वसामान्य जनता यांनी तत्काळ या औषधाचा वापर थांबवावा. जर हे औषध कोणाकडे उपलब्ध असेल, तर ते जवळच्या अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यालयास त्वरित कळवावे. किव्वा खालील माध्यमांतून थेट अन्न व औषध प्रशासनाला माहिती द्यावी . **टोल-फ्री क्रमांक**: 1800 222 365, **ई-मेल**: jchq.fda-mah@nic.in, **मोबाईल**: 9892832289

सदर औषधाचा राज्यात वितरण झालेल्या साठ्याबाबत कारवाई घेण्याकरिता अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य येथील अधिकारी तामिळनाडू, औषध नियंत्रण विभागाशी समन्वय साधून या उत्पादनाच्या महाराष्ट्रातील वितरणाचा मागोवा घेत आहे. राज्यातील विक्रेते, वितरक आणि रुग्णालये यांना सदर औषधाच्या बॅचचा साठा आढळल्यास त्याचे वितरण न करता तो सर्व साठा गोठवावा अश्या सूचना सर्व औषध निरीक्षक व सहाय्यक आयुक्त यांना देण्यात आलेल्या आहेत ,

अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य याबाबत सर्व आवश्यक उपाययोजना करिता आहे. जनतेने सावधानता बाळगावी आणि धोका टाळावा असे आव्हान प्रश्यासना मार्फत करण्यात येत आहे .

दिनांक :०५.१०.२०२५

दा.रा.गहाणे
राज्य औषध नियंत्रक
अन्न व औषध प्रशासन,
महाराष्ट्र राज्य